# महसूलवाढीसाठी सिद्धिविनायक स्थानक परिसर भाड्याने देणार

## मेट्रो-३ च्या स्थानकाचा वाणिज्यिक वापर

**मुंबई : प्रतिनिधी**

कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो-३ मार्गावरील सिद्धिविनायक मंदिर या प्रस्तावित स्थानक परिसराचा वाणिज्यिक वापर करण्याचा निर्णय एमएमआरसीएलने घेतला आहे. यामुळे एमएमआरसीएलला महसूल मोठ्या प्रमाणावर मिळण्याची शक्यता आहे. मेट्रो-३ मार्गावरील सर्वांत जास्त प्रवासीसंख्या सिद्धिविनायक मंदिर स्टेशनवर असेल असा एमएमआरसीएलचा अंदाज आहे.



**● सिद्धिविनायक मंदिर स्थानक हे तीन मजली बांधण्यात येणार असून तळमजला आणि मुख्य मजल्याच्या मध्ये एक मॅगझिन लेव्हल तयार केली जाणार आहे. ही जागा वाणिज्यिक वापरासाठी देण्यात येणार आहे. रिटेल दुकानदार, ऑफिस, बँक, शैक्षणिक संस्था, रेस्टॉरंट अशा स्वरूपाच्या वाणिज्यिक वापरातून महसूल उत्पन्नवाढ केली जाणार आहे.**

मुंबईतील प्रसिद्ध गणपती मंदिर असलेल्या प्रभादेवीच्या सिद्धिविनायक मंदिरापासून काही अंतरावर मेट्रो-३ चे हे स्थानक होणार आहे. या मंदिरात दर दिवशी सुमारे २० हजार भाविक येतात. मंगळवारी आणि संकष्टीच्या दिवशी ही संख्या ५० हजाराच्या वर पोहोचते, तर अंगारकीच्या दिवशी इथे लाखो भक्त येत असतात. भविष्यात सिद्धिविनायकाचे दर्शन घेण्यासाठी येणारे बहुतेक भक्तगण मेट्रो-३ चा मार्ग अवलंबतील, असा अंदाज आहे.त्यामुळे सिद्धिविनायक मंदिर स्थानक परिसराचा वाणिज्यिक वापर करून त्यातून उत्पन्न मिळविण्यात येणार आहे. मेट्रो-३ हा मार्ग एमएमआरसीएल सार्वजनिक पायाभूत सुविधा म्हणून चालवायचा आहे. त्यासाठी अशा पद्धतीने स्टेशन परिसरात दुकाने किंवा वाणिज्यिक वापर करण्याचा एमएमआरसीएलचा विचार आहे.

सिद्धिविनायक मंदिर ट्रस्टमार्फत विविध रुग्णांना वैद्यकीय मदत केली जाते. त्यांच्या वतीने मेट्रो-३ सिद्धिविनायक स्थानकाचा परिसर भाडेतत्त्वावर देण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्या प्रस्तावावर सर्वंकष विचाराअंती एमएमआरसीएलने यास हिरवा कंदील दाखवला आहे. सध्या सिद्धिविनायक मंदिरातील कार्यालयात येऊन रुग्णांचे नातेवाईक वैद्यकीय मदत मिळविण्यासाठीचे अर्ज भरतात. याच ठिकाणी त्यांना अन्य माहिती दिली जाते. आधीच

/...४

# महसुल वाढीसाठी सिद्धीविनायक स्थानक परिसर भाड्याने देणार

**पान ३ वरुन...** भक्तांची गर्दीआणि त्यात रुग्णांच्या नातेवाईकांची भर पडत असल्याने सुरक्षारक्षकांवरही ताण पडतो.तसेच तणावात असलेल्या रुग्णांच्या नातेवाईकांना वैद्यकीय माहितीगाराकडून नीट माहिती दिली जात नाही. त्यापेक्षा स्टेशन परिसरात असा वेगळा कक्ष निर्माण केला तर त्याठिकाणी मेट्रो स्टेशनवर उतरताच रुग्णाच्या नातेवाईकाचे योग्य ते निरसन केले जाऊ शकते अशा पद्धतीचा हा प्रस्ताव सिद्धीविनायक मंदिराच्या वतीने सादर करण्यात आला होते.

याशिवाय या परिसरातील काही नागरिकांनीही अशाच पद्धतीने वाणिज्यिक आस्थापने मेट्रो स्टेशन परिसरात सुरू करण्याची परवानगी एमएमआरसीएलकडे मागितली होती. त्याअंती एमएमआरसीएलने सिद्धीविनायक मंदिर स्टेशन परिसराचा वाणिज्यिक वापराच्या प्रस्ताव तयार केल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. लवकरच हा प्रस्ताव एमएमआरसीएलच्या बैठकीत सादर केला जाणार असून त्यास मंजुरी मिळाल्यानंतर तो सरकारकडे मंजुरीला पाठविला जाणार आहे.